

**भाजयुमो प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी वाढदिवशी जपला सेवाभाव**

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 29/09/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 228 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# औद्योगिक विकासामुळे समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यात खनिज विकास निधीतून अनेक मोठे उपक्रम राबविण्यात येत आहे. यात टाटा ट्रस्टच्या माध्यमातून कॅन्सर हॉस्पिटल, कौशल्यावर आधारित रोजगार, आरोग्य, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचा समावेश आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये इंडस्ट्रियल मॅग्नेट तयार होत असून औद्योगिक विकासामुळेच समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होणार आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुल (जि. चंद्रपूर) येथील विश्रामगृहात, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्यावतीने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे अनावरण करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोहन ठवरे व इतर अधिकारी उपस्थित होते.ज्या ठिकाणी उत्खनन होते, तेथील नागरिकांना खनिज निधीचा फायदा झाला पाहिजे, अशी संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, खनिज उत्खनन आणि वाहतुकीमुळे जो त्रास स्थानिकांना होतो. त्यामुळे खनिज निधीचा सर्वात जास्त वाटा स्थानिक लोकांनाच मिळाला पाहिजे.चंद्रपूर जिल्ह्याने खनिज क्षेत्रात अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. विशेष म्हणजे खनिज विकास निधीमधून रोजगार निर्मिती, आरोग्य, विकास, शिक्षण, कौशल्य आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्यात अतिशय चांगल्या पद्धतीने राबविण्यात येत आहे.चंद्रपूर आणि गडचिरोली हा परिसर इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होत आहे. त्यामुळे दीड लक्ष लोकांना रोजगार मिळणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखून हा विकास आपल्याला करायचा आहे. औद्योगिकरणा सोबतच चंद्रपूरने पर्यावरण संतुलन राखले, असा संदेश गेला पाहिजे. कौशल्य विकास आणि रोजगारावर भर देऊन १०० टक्के स्थानिकांना रोजगार मिळेल, अशी व्यवस्था आपण उभी करणार आहोत.

# मराठवाडा पुन्हा पुराच्या वेढ्यात !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात सहा जिल्ह्यांत पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले. शुक्रवारी रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने कर्नाटक, तेलंगणाकडे जाणारे मार्ग तसेच ग्रामीण भागातील रस्ते बंद झाले. नदी, नाले यांनी प्रवाह बदलले होतेच, शनिवारी पाणी पसरतच गेले. गोदावरी, हिंगोलीमध्ये कयाधू, बीड, लातूर आणि धाराशिवमधून जाणाऱ्या मांजरा नदीला पुन्हा पूर आला. या पावसाळ्यात मराठवाड्यातील २८५७ गावांत शेती बाधित झाली आहे. जूनपासून आतापर्यंत मराठवाड्यात पावसाने ९० बळी घेतले आहेत.अनेक भागात राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकास बोलवावे लागले. पुन्हा एकदा परंडा तालुक्यास पुराने झोडपले. नांदेड, बीड शहरात पाणी घुसले. शाळा आणि अगदी पोलीस ठाण्यापर्यंत पाणी शिरले. मराठवाड्यात लातूर, नांदेड जिल्ह्यातील शाळा व शिकवणी वर्गास शनिवारी सुट्टी देण्यात आली होती. जायकवाडी धरणातून शनिवारी सायंकाळी ३७ हजार प्रति सेकंद घनफूट वेगाने पाणी सोडण्यात येत होते. पाण्याचा प्रवाह लक्षात घेऊन धरण ९६ टक्क्यापर्यंत कमी करण्यात आले आहे.गोदावरी आणि सिंदफना नदीमुळे परभणी व नांदेड जिल्ह्यात पूर आला असून, नांदेड-हैदराबाद या प्रमुख मार्गासह जिल्हाभरातील अनेक मार्गांवरील वाहतूक बंद झाली. कंधार तालुक्यातील सावळेश्वर येथे वीज कोसळून पांडुरंग निवृत्ती कदम (वय ४७) या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मुखेड तालुक्यातील भवानी तांडा येथील शेतकरी जयराम धनाजी पवार यांच्या ३५ शेळ्या शुक्रवारी सायंकाळी वाहून गेल्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 29/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# स्वच्छ शहर जोडी उपक्रमात पिंपरी महापालिका ठरली मार्गदर्शक

## पाच नगरपरिषदांसोबत सामंजस्य करार



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या “स्वच्छ शहर जोडी (SSJ) उपक्रमात” पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये झाली आहे. या यशस्वी निवडीमुळे पिंपरी चिंचवड महापालिका आता लहान शहरांसाठी आदर्श ठरणार आहे.या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शहरांना, उत्तम कामगिरी करण्यासाठी काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका पुढील पाच नगरपरिषद व नगरपंचायतींना मार्गदर्शन करणार आहे –सुरगाणा नगरपंचायत (जि. नाशिक)लांखादूर नगरपंचायत (जि. भंडारा)मंचर नगरपंचायत (जि. पुणे)जामखेड नगरपरिषद (जि. अहिल्यानगर)आळंदी नगरपरिषद (जि. पुणे)या संदर्भातील सामंजस्य कराराचा कार्यक्रम ऑटो क्लस्टर, पिंपरी येथे पार पडला. केंद्रीय मंत्री मा. मोहनलाल खट्टर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत हा करार झाला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी करारावर स्वाक्षरी केली.कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी महादेव खांडेकर (आळंदी), अजय साळवे (जामखेड), गोविंद जाधव (मंचर), सचिन कुमार पटेल (सुरगाणा) आदी मान्यवर उपस्थित होते.आयुक्त शेखर सिंह यांनी या नगरपरिषदांच्या घनकचरा व्यवस्थापन, कचरा विलगीकरण, संकलन व प्रक्रिया प्रणालींचा सविस्तर आढावा घेतला. या संदर्भात ते म्हणाले “पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सर्व नगरपरिषदांना स्वच्छता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी साध्य करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल अनुभव, तंत्रज्ञान व व्यवस्थापन पद्धतींचा लाभ या संस्थांना दिला जाईल.”आरोग्य विभाग प्रमुख सचिन पवार यांनी देखील महापालिकेच्या यशस्वी प्रकल्पांची माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, “या नगरपरिषदांच्या कामगिरीत सातत्याने वाढ होण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा, मार्गदर्शन आणि सहकार्य वेळोवेळी केले जाईल.”स्वच्छ भारत मोहिमेच्या पुढील टप्प्यात पिंपरी चिंचवड महापालिकेने फक्त स्वतःच्या शहरापुरती मर्यादा न ठेवता इतर शहरांना सक्षम करण्याचा पुढाकार घेतला आहे. यामुळे स्वच्छतेच्या दिशेने एकात्मिक आणि सामूहिक प्रगती घडून येणार आहे.

# महाराष्ट्राची पारंपरिक लोककला जतन करणे आवश्यक - पृथ्वीराज नागवडे

## ज्येष्ठ गायिका माणिक वर्मा यांना जन्मशताब्दी वर्षानिमित्त आदरांजली



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बदलत्या काळात महाराष्ट्राची लोककला, नृत्य आणि सांस्कृतिक परंपरा जिवंत ठेवणे आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे महत्त्वचे आहे. महाराष्ट्राची संपन्न लोकपरंपरा, लोककला त्याच्या मूळ स्वरूपात सादर करण्यासाठी आणि याबाबतचा प्रसार करून लोकांना त्याच्याशी जोडण्यासाठी ‘अस्मिता महाराष्ट्राची’ या सांस्कृतिक समूहाची स्थापना करण्यात आली, असे मत निर्माते पृथ्वीराज नागवडे यांनी व्यक्त केले. ३१व्या पुणे नवरात्रौ महोत्सवात ‘अस्मिता महाराष्ट्राची’ कार्यक्रम सदर झाला. त्यावेळी ते बोलत होते. पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक-अध्यक्ष आबा बागुल यांनी सर्व कलाकारांचे कौतुक करून या महोत्सवाचे आधारस्तंभ बनलेले ‘राष्ट्रपती पुरस्कारा’ने सन्मानित ज्येष्ठ लोककलावंत कै. केशवराव बडगे यांचा आवर्जून उल्लेख केला. महाराष्ट्राची पारंपरिक लोककला जिवंत ठेवण्यासाठी असे कार्यक्रम होणे गरजेचे असल्याची भावना आबा बागुल यांनी यावेळी व्यक्त केली.या कार्यक्रमात प्रारंभी दिवंगत ज्येष्ठ गायिका पद्मश्री माणिक वर्मा यांना जन्मशताब्दी वर्षानिमित्त महोत्सवाचे आयोजक-अध्यक्ष आबा बागुल, निर्माते पृथ्वीराज नागवडे आणि सर्व कलाकारांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच गायिका माणिक वर्मा यांनी गायलेले प्रसिद्ध ‘अमृताहूनि गोड..’ हे भावगीत गाऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. राज्यभरातील ५०पेक्षा अधिक नवोदित कलाकार मेहनतीने आणि निष्ठेने पारंपरिक लोककला आत्मसात करुन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘अस्मिता महाराष्ट्राची’ माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे यावेळी दिसून आले. पुरुष कलाकारांनी सदरा, धोतर आणि फेटा, तर महिला कलाकारांनी नऊवारी साडी नेसून हातात भगवा झेंडा फडकवीत जल्लोषपूर्ण पद्धतीने विठुरायाची पालखी थेट प्रेक्षकांमधून घेऊन येत कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात केली. भारुड, गोंधळ, पोतराज, जोगवा, वासुदेव, बतावणी, वाघ्या-मुरळी या लोकनाटय आणि पारंपरिक कलाप्रकारांच्या सादरीकरणातून रसिकांना दुर्मिळ होत चाललेल्या ग्रामीण परंपरांची पुनर्आठवण कलाकारांकडून करून देण्यात आली. पारंपरिक ग्रामीण संस्कृती शहरातील लोकांना पुन्हा माहीत व्हावी, असा प्रयत्न याद्वारे करण्यात आला. संगीत व नृत्यशैलीच्या माध्यमातून लावणी, कोळीनृत्य, मंगळागौर, ढोल-ताशा-लेझीम, गवळण, अंगाई गीत, शंकासुर, काठोळी आदी प्रकार सादर करण्यात आले. कोणत्याही आधुनिक फ्युजनशिवाय आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरांची महती गण, अभंग, वारी, धनगरी गजा, तुंबडी, भल्लरी, नंदीबैल सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आली. प्रशांत मखरे यांनी अभ्यासपूर्ण आणि सहजरीत्या सर्वांना भावेल अशा भाषाशैलीत सूत्रसंचालन करीत कार्यक्रमात रंगत आणली. पुणे नवरात्रौ महोत्सवातील "अस्मिता महाराष्ट्राची" कार्यक्रमाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.यावेळी कलाकारांना विविध लोकपरंपरा सादर करताना सिद्धेश उंडाळकर ( पखवाज), कृष्णा अवघडे (ढोलकी, संबळ), साहिल कांबळे (ड्रम), अनिकेत काळोखे, अभिषेक सुरडकर (पियानो) , श्रेया बऱ्हाटे (बासरी), जयेश म्हस्के ( ढोल), आफताब शाह ( हार्मोनियम ), ऋषिकेश उंडाळकर , शुभम मुकीर (साइड ऱ्हिदम) यांनी आपल्या वादनातील कौशल्य दाखवीत साथ दिली. तर, गायनासाठी गायक म्हणून ऋषिकेश आडे, प्रदीप लोंढे, सोपान कामगुणे, सौरव चव्हाण, रोहित शिंदे आणि गायिका सानिका अभंग, श्रद्धा गद्रे, जान्हवी गद्रे, पायल वारुंगसे, रुचिता शिरसाठ, जान्हवी खडपकर यांनी सहाय्य केले.याप्रसंगी जयश्री बागुल, घनश्याम सावंत, रमेश भंडारी, नंदकुमार बानगुडे, नंदकुमार कोंढाळकर, अमित बागुल, हर्षदा बागुल, सागर बागुल उपस्थित होते.

# पुणे नवरात्रौ महोत्सवात सलग 12 तासांचा लावणी धमाका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : घुंगरांचा आवाज आणि ढोलकीची थाप, लालित्यपूर्ण पदन्यास, सोबत गाण्यातील आर्जव, प्रेक्षकांचे ‘वन्स मोअर’चे नारे, टाळ्यांचा कडकडाट आणि हजारो रसिक प्रेक्षकांची गर्दी अशा लावणीमय वातावरणात ‘पुणे नवरात्रौ महोत्सवा’त रविवारी दुपारी १२ पासून सलग १२ तासांचा ‘लावणी धमाका’ श्री गणेश कला-क्रीडा रंगमंच येथे आयोजित केला गेला. “महाराष्ट्रात सलग १२ तासांचा धमाकेबाज ‘लावणी महोत्सव’ पुणे नवरात्रौ महोत्सवात आम्ही प्रथम ३१ वर्षांपूर्वी सुरू केला. गेली ३१ वर्षे त्यास चोखंदळ पुणेकरांनी प्रचंड मोठा प्रतिसाद दिला, याबद्दल सर्व लावणी कलावंत आणि रसिक पुणेकर यांचे मी आभार मानतो,” असे भावपूर्ण उद्गार पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक-अध्यक्ष व पुण्याचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी उद्घाटनप्रसंगी काढले. विक्रमी लावणी महोत्सवात सीमा पोटे, भाग्यश्री बारामतीकर (पाव्हनं फक्त तुमच्यासाठी), रक्षा पुणेकर, काव्या पुणेकर (तुमच्यासाठी कायपण), रील स्टार कुकू, वर्षा मुंबईकर (लावणी सुपरस्टार), सिनेतारका अर्चना सावंत, ज्योती मुंबईकर (मदनाची मंजिरी), शलाका पुणेकर, सोनाली शिंदे (कैरी मी पाडाची) या नामवंत कलावंत सहकाऱ्यांसह सहभागी झाल्या होत्या.



या सर्वांनी तब्बल १२ तास ठसकेबाज लावणी सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली.प्रारंभी भारतरत्न स्वरसम्राज्ञी कै. लता मंगेशकर यांच्या २८ सप्टेंबर या जन्मदिनानिमित्त त्यांच्या तैलचित्रास आबा बागुल यांच्यासमवेत लावणी कलावंतांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. त्यानंतर लावणी महोत्सवास प्रारंभ झाला. महोत्सवाची सुरुवात गण-गवळण व मुजऱ्याने झाली. शंभरहून अधिक लावण्यवतींनी आपला नृत्याविष्कार सादर करून प्रत्येक लावणीत प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. श्री गणेश कला-क्रीडा रंगमंचाचे प्रेक्षागृह दुपारी १२पासून रसिक प्रेक्षकांनी अखेरपर्यंत गच्च भरले होते. यावेळी प्रेक्षकांनी शिट्ट्या, टाळ्या व नृत्य करून लावणीला ‘वन्स मोअर’ची दाद दिली. या लावणी महोत्सवात महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. त्यांचाही मोठा प्रतिसाद होता. ‘माझी मैंना गावाकडे राहिली’, ‘तुम्हावर केली मी मर्जी बहार’, ‘रात्र धुंदीत ही जागवा..’, ‘कैरी मी पाडाची....’, ‘पैलवान आला हो पैलवान आला...’, ‘तुमच्या पुढ्यात कूटते मी...’, तुमच्यासाठी जीव झाला वेडा पिसा’, ‘आंबा तोतापुरी’, ‘नाद खुळा’, ‘या रावजी बसा भावजी’, ‘फड सांभाळ तुऱ्याला’, ‘होऊ द्या दमानं’, ‘येऊ कशी तशी नांदायला’, ‘मला म्हनत्यात हो पुण्याची मैना’, ‘तुझ्या उसाला लागंल कोल्हा’ अशा अनेक लावण्यांच्या सादरीकरणाला रसिकांनी दाद दिली. ‘विचार काय आहे तुमचा पाहुनं...’, ‘मला वाटलं होतं तुम्ही याल...’, ‘शिट्टी वाजली गाडी सुटली....’, ’आजकाल पाटलाचा’, ’, ‘चंद्रा’ चित्रपटातील ‘बान नजंतला घेऊनि अवतरली चंद्रा’, ‘नटरंग’ चित्रपटातील ‘नटरंग उभा’ अशा एकाहून एक सरस अशा लावण्या व गवळणीच्या सादरीकरणाने रसिकांवर लावणी या लोकप्रिय लोककलेची भुरळ घातली. याबरोबरच ‘बुगडी माझी सांडली गं...’ या लावणीने ‘वन्स मोअर’ची दाद मिळविली. ‘नाद एकच बैलगाडा शर्यत’ ही लावणी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. ‘इंद्राची अप्सरा आली...’, ‘कान्हा वाजवितो बासरी’ यांसह ‘वाजले की बारा...’, ‘अप्सरा आली...’, या ‘नटरंग’ चित्रपटातील लावण्यांना रसिकांनी भरभरून दाद दिली. ‘पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा...’ या बैठकीच्या लावणीच्या सादरीकरणाने आपल्या हावभावातून लावण्यवतींनी रसिकांची मने जिंकली. ‘मी मेनका उर्वशी...’ आणि ‘छत्तीस नखरेवाली...’ या लावण्यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात बहार आणली. ‘केसात गुंफूनि गजरा तुम्हाला मानाचा मुजरा..’, ‘तुमच्या पुढ्यात बसले मी..’, ‘बाई माझी करंगळी मोडली’, ‘आई मला नेसव शालू नवा’ अशा ठसकेबाज जुन्या लावण्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांची दाद दिली. हावभाव, पदन्यास आणि ढोलकीची थाप यांच्या एकत्रित सादरीकरणाने लावणी या लोककलेचा अप्रतिम कलाविष्कार रसिकांनी अनुभवला.

तब्बल सलग १२ तास नृत्यांगनांनी आपली लावणी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक-अध्यक्ष व माजी उपमहापौर आबा बागुल, पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा सौ. जयश्री बागुल यांनी मान्यवरांचा व कलाकारांचा सत्कार केला. अनेक राजकीय सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील नामवंत कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. यावेळी पुणे नवरात्रौ महोत्सवाचे विश्वस्त घनश्याम सावंत, नंदकुमार बानगुडे, रमेश भंडारी, नंदकुमार कोंढाळकर, मुख्य संयोजक अमित बागुल आदी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घनश्याम सावंत यांनी केले. हा लावणी महोत्सव रात्री उशिरापर्यंत सुरू राहिला. लावणीरसिकांनी सारे प्रेक्षागृह तुडुंब भरले होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात कर्मवीर जयंती व्याख्यान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात कर्मवीर जयंती व्याख्यानाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, नारायणगाव उपस्थित होते, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. ॲड्. राम कांडगे उपाध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी भूषविले. मा. दत्तात्रय गायकवाड, मा. महापौर, पुणे महानगरपालिका व सदस्य सीडीसी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध – पुणे यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा देताना ते म्हणाले, या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य,डॉ. अरुण आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय




घौडदौड करत आहे. आजच्या या कार्यक्रमाचे स्वरूप आगळे वेगळे असेच आहे. प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी मार्गदर्शन करताना म्हणाले, कर्मवीरांचे कार्य हिमालयापेक्षा उतुंग आहे. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी काही नियम घालून दिले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपली कामे स्वतः करावीत. स्वावलंबनाणे जगावे. प्रत्येकाने श्रमाला प्रतिष्ठा द्यावी. वेळेवर पहाटे ४.३० ला उठावे, वेळेवर अभ्यास करावा, रात्री १०.३० ला झोपावे. काटेकोर शिस्त पाळावी. जगातील महान माणसं सारखाच विचार करतात आणि सारखेच जीवन जगतात. आण्णांनी वसतिगृहसाठी जे दहा नियम केले होते ते जर आपण आचरणात आणले तर आपलेही जीवन बदलून जाईल. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. ॲड्. राम कांडगे म्हणाले,कर्मवीर आण्णांनी सर्वोत्तम मानवतावाद जीवनात आणला. महाराष्ट्र धर्म खऱ्या अर्थाने जगवला आणि जागवला. कर्मवीर ही पदवी आण्णांना गाडगे महाराजांनी दिली. महाराष्ट्राची परंपरा ही संतांची, शूरांची,समाजसुधारकांची आणि बुद्धीवंतानची आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. प्राचार्य, डॉ. अरुण आंधळे यांनी केले. आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रो. डॉ. प्रभंजन चव्हाण यांनी केले, तर सूत्रसंचालन IQAC समन्वयक व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सविता पाटील यांनी केले. यावेळी मा. दत्तात्रय गायकवाड, विभागीय अधिकारी (पश्चिम विभाग), रयत शिक्षण संस्था, सातारा तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

# भाजयुमो प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी वाढदिवशी जपला सेवाभाव

## मराठवाडा, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यांतील पूरग्रस्तांना 'एक हात मदतीचा'..

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - मराठवाडा, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यांतील भीषण पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा प्राधिकरण येथील जनसंपर्क कार्यालयात साधेपणाने व समाजाभिमुख उपक्रमांनी साजरा करण्यात आला.सध्या मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात हजारो कुटुंबांचे हाल होत आहेत. अन्नधान्य, वस्त्र, निवारा, औषधे यांची तीव्र टंचाई भासत आहे.

या परिस्थितीत वाढदिवस साजरा करण्याऐवजी अनुप मोरे यांनी समाजहिताचा मार्ग स्वीकारला. अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने “एक हात मदतीचा” या उपक्रमातून पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, औषधे, शालेय साहित्य अशा मदतसामग्रीचा मोठा साठा तयार करून ती सामग्री पुरबाधित भागात रवाना करण्यात आली.सोहळ्याची सुरुवात आकुर्डीतील तुळजाभवानी मातेच्या दर्शनाने करण्यात आली.

त्यानंतर मातृसेवा सेवाभावी संघातील निराधार ज्येष्ठ नागरिकांची भेट घेऊन त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. त्यांच्या आरोग्याची विचारपूस करत आशीर्वाद घेण्याचा भावनिक क्षणही अनुभवास आला.समाजहिताच्या दृष्टीने रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आकुर्डी येथील कुटे हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे एकूण ७६ रक्तदात्यांनी रक्तदान करून जीव वाचविण्याच्या कार्यात योगदान दिले. याशिवाय गोमातेचे पूजन व गाईंसाठी चारा वाटप करून पर्यावरण आणि पशुप्रेमाचा संदेशही देण्यात आला.

या विधायक उपक्रमांदरम्यान भाजपसह सर्वपक्षीय नेत्यांनी अनुप मोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांमध्ये भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, मावळचे खासदार श्रीरंग बारणे,प्राधिकरण मा.अध्यक्ष सदाशिव खाडे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी नगरसेवक उल्हास शेट्टी, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, माजी नगरसेवक राहुल कलाटे, राम वाकडकर, प्रसाद शेट्टी, केशव घोळवे, विनायक गायकवाड, राजू मिसाळ, प्रमोद कुटे, आर एस कुमार, सलीम शिकलगार, राजेंद्र बाबर, विजय शिनकर, अरुण थोरात, अतुल इनामदार, समीर जावळकर, मनोज देशमुख, सचिन कुलकर्णी, यांच्यासह भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते दरम्यान, मिस अर्थ इंडिया २०२५ स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कोमल चौधरी आणि महाराष्ट्र टेबल टेनिस स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या सानवी मोरे यांचा अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला वेगळेच वैशिष्ट्य प्राप्त झाले.समाजहित, सेवाभाव, पर्यावरणप्रेम आणि क्रीडाप्रेम अशा विविध अंगांनी सजलेल्या या आगळावेगळ्या सोहळ्यामुळे अनुप मोरे यांचा वाढदिवस केवळ एक औपचारिक अभिष्टचिंतन न राहता समाजासाठी प्रेरणादायी संदेश देणारा दिवस ठरला.

# पुणे नवरात्रौ महिला महोत्सवात कन्यापूजानात 1000 कन्या सहभागी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : वयोगट ३ ते १२ वर्षांमधील १०००हून अधिक कन्या, रंगीबेरंगी ड्रेस, कपाळावर चुनरी, चंद्रकोर, स्तोत्रपठण, लकी ड्रॉ, खाऊवाटप अशा उत्साही वातावरणात शिवदर्शन–सहकारनगर परिसरातील श्री लक्ष्मीमाता मंदिराच्या प्रांगणात ललिता पंचमीनिमित्त पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाअंतर्गत आज कन्यापूजन कार्यक्रम संपन्न झाला. प्रांगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. सहभागी सर्व लहान मुलींच्या कपाळावर चुनरी, चंद्रकोर आणि कुमकुम तिलक पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा सौ. जयश्री बागुल यांनी लावले. या सर्व लहान कन्यांचे पाय धुऊन त्यावर स्वस्तिक चिन्ह काढण्यात आले. त्यानंतर औक्षण करून गजरे देण्यात आले. तसेच सामूहिक आरती करण्यात आली.यावेळी बालगीते व नृत्याचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

यावेळी या मुलींनी नऊवारी साडी, घागरा, पंजाबी ड्रेस असे रंगीबेरंगी पोशाख परिधान केले होते. याशिवाय कालिका देवी, लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा, अर्धनारी नटेश्वर, कमळातील देवी अशी रूपे वेशभूषेतून साकारली होती.

याप्रसंगी अनेक मुलींनी गणपती स्तोत्र, श्रीसूक्तपठण, दुर्गास्तुती तोंडपाठ म्हणून दाखवली आणि उपस्थितांची मने जिंकली. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लकी ड्रॉमधील विजेत्या दुर्वा जाधव, नंदिनी राजपूत, अक्षरा कदम, समृद्धी पवार, आरुषी भारती या मुलींना सायकल, ब्लँकेट, कॅरम इत्यादी बक्षिसे देण्यात आली. तसेच लकी ड्रॉमधील अन्य १० मुलींना स्कूल बॅग्ज व प्रवासी बॅग्ज देण्यात आल्या. सहभागी सर्व मुलींना वॉटरबॅग व खाऊ देण्यात आला. याप्रसंगी पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक-अध्यक्ष व माजी उपमहापौर आबा बागुल यांनी सर्वांचे स्वागत केले आणि प्रत्येकीला “तू मोठी झाल्यावर काय होणार ?” असे विचारले. यावर अनेकींनी डॉक्टर, पोलीस इन्स्पेक्टर, शास्त्रज्ञ अशी उत्तरे दिली. यावर आबा बागुल म्हणाले की, “मुलींना मोठी स्वप्ने बघू द्यात आणि त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी पालकांनी विशेष मेहनत घेतली पाहिजे.”

पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा जयश्री बागुल यांनी स्त्रीभ्रूणहत्येविरुद्ध व सुरक्षेबाबत आवाज उठविण्याचे आवाहन करून म्हटले की, “पालकांनी मुलगी झाली तरी आनंदच मानला पाहिजे.मुलीला खूप शिकवा किंवा विविध कलांमध्ये पारंगत करा. त्याचबरोबर आपले कुटुंब, नातेवाईक, मित्र, शेजारी या सर्वांमध्ये स्त्रीभ्रूणहत्येबद्दल व सुरक्षेबद्दल जागरण करा.” कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता बागुल, नूपुर बागुल आणि योगिता निकम यांनी केले. यावेळी डॉ. सौ. रांका, सौ. सुचेता अण्णा थोरात, उद्योगपती सुधीर वाघोलीकर उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579